जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 8 FEB 2024
तरूण भारत

# विद्यापीठातील विद्यार्थिनींनी मिळवले २ लाखांचे बीजभांडवल

- महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंज उपक्रमात यश
- कुलगुरूंकडून कौतुक

कोल्हापूर : महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीमार्फत राज्यातील विद्यार्थ्यांच्या नवसंकल्पनांना मूर्त स्वरूप देण्याकरिता महाराष्ट्र स्टुडन्ट इनोव्हेशन चॅलेंजतर्फे आयोजन करण्यात आले होते. या चॅलेंजमधून शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागातील दोन विद्यार्थिनींच्या नवसंकल्पनांकरिता दोन लाखाचे बीज भांडवल व प्रशस्तीपत्र प्राप्त झाले आहे. प्रजासत्ताक दिनी पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते विद्यार्थिनींना प्रमाणपत्र व प्रत्येकी एक लाख रूपये बीज भांडवल देऊन गौरविण्यात आले. महाराष्ट्र स्टुडन्ट इनोव्हेशन चॅलेंजमध्ये तंत्रज्ञान अधिविभागातील दिशा बोंगार्डे (तृतीय वर्ष, फूड टेक्नॉलॉजी) व आदिती रानमाळे (प्रथम वर्ष, कॉम्प्युटर सायन्स अँड टेक्नॉलॉजी) या विद्यार्थिनींनी तंत्रज्ञान अधिविभागातील सहाय्यक प्राध्यापक हर्षवर्धन पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली नवसंकल्पना सादर केल्या होत्या. त्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी या विद्यार्थिनींचे अभिनंदन केले. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, स्पर्धेतील यश शिवाजी विद्यापीठासाठी आनंदाची बाब आहे. विद्यार्थ्यांनी समाजाच्या तळागाळातील विविध प्रश्नांवर तंत्रज्ञानाच्या मदतीने समस्या समाधान शोधले पाहिजे. नवसंकल्पनांना पाठबळ देण्यासाठी शिवाजी विद्यापीठ कायम विद्यार्थ्यांच्या पाठीशी राहील. यावेळी तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली, प्रा. हर्षवर्धन पंडित उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 FEB 2024
लोकमत

# विद्यार्थिनींनी मिळवले २ लाखांचे बीज भांडवल

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटीमार्फत राज्यातील विद्यार्थ्यांच्या नवसंकल्पनांना मूर्त स्वरूप देण्यासाठी आयोजित महाराष्ट्र स्टुडंट इनोव्हेशन चॅलेंजमधून शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागाच्या दोन विद्यार्थिनींना नवसंकल्पनांकरिता दोन लाखांचे बीज भांडवल व प्रशस्तीपत्र प्राप्त झाले.

पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते या विद्यार्थिनींना प्रमाणपत्र व प्रत्येकी रुपये एक लाख बीज भांडवल देऊन गौरविण्यात आले. तंत्रज्ञान अधिविभागातील दिशा बोंगार्डे (तृतीय वर्ष, फूड टेक्नॉलॉजी) व आदिती रानमाळे (प्रथम वर्ष, कॉम्प्युटर सायन्स अँड टेक्नॉलॉजी) या विद्यार्थिनींनी हर्षवर्धन पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली नवसंकल्पना सादर केल्या होत्या. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू प्रा. डॉ प्रमोद पाटील यांनी या विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.

0 8 FEB 2024 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांचा १६ फेब्रुवारीला संसदेत होणार गौरव

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या युवा संसदेच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल पारितोषिक स्वीकारण्यासाठी संसदीय कार्यमंत्रालयाचे निमंत्रण आले आहे. १६ फेब्रुवारी रोजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांचा संसदेत होणार गौरव आहे.

भारत सरकारच्या वतीने नुकतेच शिवाजी विद्यापीठाच्या युवा संसदेचे समन्वयक डॉ. प्रल्हाद माने यांना १६ व्या राष्ट्रीय युवा संसद स्पर्धेच्या बक्षीस वितरण कार्यक्रमासाठी नवी दिल्ली येथे उपस्थित राहण्याचे पत्र प्राप्त झाले आहे. विद्यापीठातील ५५ विद्यार्थ्यांच्या संघाने २३ मे रोजी झालेल्या स्पर्धेत सहभाग घेतला होता. स्पर्धेत प्रश्न तास, विशेषाधिकाराचा भंग, कॉलिंग अटेंशन मोशन, वैधानिक कामकाज, विधेयक सादर करणे आदी संसदीय कार्यप्रणालीतील विषयांची चर्चा झाली. संसदीय कार्यमंत्रालयाचे राज्यमंत्री अर्जुनलाल मेघवाल यांच्या अध्येक्षतेखाली राष्ट्रीय युवा संसदेच्या बक्षीस वितरणाचा कार्यक्रम संसदेच्या आवारातील बालयोगी सभागृहामध्ये होणार आहे. शिवाजी विद्यापीठाच्या युवा संसदेच्या संघाचा समूह स्तरावर पहिला क्रमांक आल्याबद्दल चषक मिळणार आहे. युवा संसदेचे

समन्वयक डॉ. प्रल्हाद माने व आठ बक्षीसप्राप्त विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात येणार आहे. यात अनमोल पाटील, आसिया जमादर, श्रेया म्हापसेकर, पवन पाटील, साईसीमरन घाशी, प्रतीक्षा पाटील, रुतिका धनगर, प्रतीक्षा कांबळे यांचा समावेश आहे. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. पी. टी. गायकवाड यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 FEB 2024
लोकमत

# शारदा उग्र यांचे उद्या विद्यापीठात व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या



मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने उद्या शुक्रवारी दुपारी दोन वाजता ख्यातनाम क्रीडा पत्रकार शारदा उग्र यांचे क्रीडा पत्रकारिता विषयावर व्याख्यान होणार आहे. पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या इमारतीत हा कार्यक्रम होईल. शारदा उग्र गेल्या तीन दशकांहून अधिक काळ क्रीडा पत्रकार म्हणून कार्यरत आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 FEB 2024
पुण्यनगरी

# शारदा उग्र यांचे उद्या विद्यापीठात व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागातर्फे शुक्रवार, दि. ९ फेब्रुवारी रोजी दुपारी २ वाजता ख्यातनाम क्रीडा पत्रकार शारदा उग्र यांचे क्रीडा पत्रकारिता विषयावर व्याख्यान होणार आहे. पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या इमारतीत हा कार्यक्रम होईल. शारदा उग्र यांनी अनेक प्रतिष्ठित वृत्तपत्र समूहात तसेच वृत्तवाहिन्यांमध्ये पत्रकारिता केली आहे. गेल्या तीन दशकाहून अधिक काळ त्या क्रीडा पत्रकार म्हणून कार्यरत आहेत. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे. क्रीडा पत्रकार आणि पत्रकारितेची आवड असणाऱ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 FEB 2024
पुढारी

# शारदा उग्र यांचे उद्या विद्यापीठात व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागातर्फे शुक्रवारी (दि. ९) दुपारी दोन वाजता क्रीडा पत्रकार शारदा उग्र यांचे क्रीडा पत्रकारिता विषयावर व्याख्यान होणार आहे. पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या इमारतीत हा कार्यक्रम होईल.

शारदा उग्र यांनी द हिंदू, हिंदुस्तान टाईम्स, इंडिया टुडे, ईएसपी एन अशा अनेक प्रतिष्ठित वृत्तपत्र समूहात तसेच वृत्तवाहिन्यांमध्ये पत्रकारिता केली आहे. गेल्या तीन दशकांहून अधिक काळ त्या क्रीडा पत्रकार म्हणून कार्यरत आहेत.

कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे. क्रीडा पत्रकार व पत्रकारितेची आवड असणाऱ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

0 8 FEB 2024 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# २१७० जणांनी दिली 'पीएच.डी.ची' प्रवेश परीक्षा

कोल्हापूर, ता. ७ : शिवाजी विद्यापीठातील कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखेतील विविध अभ्यासक्रमांतील पीएच.डी. पदवी प्रवेश परीक्षा एकूण २१७० विद्यार्थ्यांनी दिली. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील केंद्रांवर मंगळवारी आणि बुधवारी परीक्षा घेण्यात आली.

छत्रपती शहाजी कॉलेज (कोल्हापूर), श्रीमती कस्तुरबाई वालचंद कॉलेज (सांगली), सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय (सातारा) या केंद्रांवर परीक्षा घेण्यात आली. त्यासाठी एकूण ३१०० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी २१७० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली, तर ९३० जण अनुपस्थित राहिले, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 FEB 2024
तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठांतर्गत पीएच.डी.प्रवेश परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठांतर्गत शैक्षणिक वर्ष सन २०२३-२४ मधील पीएच.डी. प्रवेश परीक्षा सुरळीत पार पडली. ही परीक्षा कोल्हापूर जिल्ह्यात शहाजी कॉलेज सांगली जिल्ह्यात श्रीमती कस्तुरबाई वालचंद कॉलेज तसेच सातारा जिल्ह्यात सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय या कॉलेजमधे झाली. ही परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने होती. पंधरा विषयांसाठी १६०८ विद्यार्थ्यांपैकी १११२ विद्यार्थी उपस्थित होते तर ४९६ विद्यार्थी अनुपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 FEB 2024
पुण्यनगरी

# 'पीएचडी'साठी २१७० विद्यार्थ्यांनी दिली प्रवेश परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे शैक्षणिक वर्ष सन २०२३-२४ मधील पीएच.डी.साठी प्रवेश परीक्षा दि. ६ आणि दि. ७ फेब्रुवारी रोजी घेण्यात आली. परीक्षा शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित सांगली, सातारा व कोल्हापूर या तिन्ही जिल्ह्यांमध्ये वर्णनात्मक पद्धतीने आयोजित केली होती. बुधवारी वीस विषयांच्या परीक्षा घेण्यात आल्या. सकाळी १० ते १२, १ ते ३ व ४ ते ६ या तीन सत्रात परीक्षा पार पडली. परीक्षेसाठी एकूण १४९२ विद्यार्थ्यांपैकी १०९८ विद्यार्थी उपस्थित होते. त्याचे प्रमाण ७०.९१ टक्के इतके आहे. मंगळवार आणि बुधवार या दोन्ही दिवशी एकूण ३१०० विद्यार्थी होते. त्यापैकी २१७० विद्यार्थी उपस्थित होते. या दोन्ही दिवसांच्या विद्यार्थ्यांच्या उपस्थितीची टक्केवारी ७० टक्के आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 8 FEB 2024
पुढारी

# पीएच.डी. प्रवेश प्रक्रियेला प्रारंभ

कोल्हापूर : शैक्षणिक वर्ष सन २०२३-२४ मधील पीएच.डी. प्रवेश परीक्षेला प्रारंभ झाला आहे. या परीक्षा शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सांगली, सातारा व कोल्हापूर या तिन्ही जिल्ह्यांमध्ये होत आहे. परीक्षेसाठी एकूण १४९२ विद्यार्थ्यांपैकी १०९८ विद्यार्थी उपस्थित होते, तर ४३४ विद्यार्थी अनुपस्थित होते. परीक्षेस बसण्याचे प्रमाण ७०.९१ टक्के इतके आहे. प्रवेश परीक्षेचा आज शेवटचा दिवस आहे.

0 8 FEB 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ संघास विजेतेपद

## आंतरविद्यापीठ पुरुष फुटबॉल स्पर्धा : राज्यातील वीस संघांचा सहभाग

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ७ : लोणेरे (जि. रायगड) येथे झालेल्या क्रीडा महोत्सव आंतरविद्यापीठ पुरुष फुटबॉल स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघाने विजेतेपद पटकावले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी येथे स्पर्धा झाली.

महाराष्ट्रातील वीस विद्यापीठांचा सहभाग असलेल्या स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाने सर्वच संघांवर एकतर्फी मात केली. गट साखळीमध्ये रामटेक ३-०, मुंबईच्या डॉ. होमी भाभा विद्यापीठावर मुंबई संघास ६-० ने पराभूत केले. मुंबईच्या एच. एस. एन. सी. विद्यापीठाविरुद्ध १-१ ने बरोबरी साधली. उपांत्य सामन्यात मुंबई विद्यापीठाचा ३-० ने पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला.



कोल्हापूर : लोणेरे (जि. रायगड) येथे झालेल्या क्रीडा महोत्सव आंतरविद्यापीठ पुरुष फुटबॉल स्पर्धेत विजेतेपद पटकाविणारा शिवाजी विद्यापीठाचा संघ.

अंतिम सामन्यात अमरावतीच्या संत गाडगेबाबा विद्यापीठाला ४-० ने हरवले. मध्यंतरापर्यंत अदित्य कल्लोळीच्या गोलच्या जोरावर शिवाजी विद्यापीठाचा संघ १ गोलने आघाडीवर होता. उत्तरार्धात अधिक आक्रमक चाली रचत मध्यंतरानंतर ५ व्या मिनिटाला प्रथमेश हेरेकरने तर १५ व्या मिनिटाला कल्लोळीने वैयक्तिक दुसरा गोल करत संघाला ३ गोलची आघाडी मिळवून दिली. सामना संपण्यास पाच मिनिटे शिल्लक असताना लहान डीमध्ये मिळालेल्या पासवर रोहित पोवारने मैदानी गोल करत विजयावर शिक्कामोर्तब केले. संघास प्रशिक्षक डॉ. अभिजित वणिरे व रोहित कुरणे यांचे मार्गदर्शन मिळाले.

### विजयी संघ असा

अनिल जानकर (गोलरक्षक), साहिल खोत, ऋतुराज संकपाळ, ऋतुराज सूर्यवंशी, यश देवणे, प्रभू पोवार, संकेत जत्ग, रोहित पोवार, प्रथमेश हेरेकर, आदित्य कल्लोळी, सिद्धेश साळोखे, आविष्कार राऊत, निरंजन खोत, यश मर्देकर, ओंकार खोत.